# DeccanIAS™

संच क्र. **D**

UPSC/MPSC

**2020**

G11

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.

वेळ : 1 (एक) तास

## प्रश्नपुस्तिका

## सामान्य क्षमता चाचणी – 5

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

### सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे**. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.''**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

### ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अश्या व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Email : executivedeccanias@gmail.com **Mob : 9421535607 /7517685197**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

DeccanIAS

1) पुढे दिलेल्या विधानांपैकी असत्य विधाने ओळखा.

अ) अनुच्छेद 29 आणि अनुच्छेद 30 मधील मूलभूत हक्क केवळ अल्पसंख्यांकांनाच उपलब्ध असतात; बहुसंख्यांकांना नाही.

ब) ज्या 'अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना' राज्यसंस्थेची मान्यता किंवा अनुदानही नसते त्यांना त्यांचे प्रशासन चालवण्याचे (इतर साधारण कायद्यांचे पालन करून) स्वातंत्र्य असते.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) यापैकी नाही

---

2) उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची बदली (transfer) करताना सरन्यायाधीशांनी कोणाबरोबर चर्चा (consult) करणे गरजेचे असते?

अ) सर्वोच्च न्यायालयातील चार सेवाज्येष्ठ न्यायाधीश

ब) जिथून बदली होणार आणि जिथे बदली होणार त्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश

क) ज्या न्यायाधीशांची बदली केली जाणार आहे ते न्यायाधीश.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ, ब 4) अ, ब, क

---

3) भारतीय घटनेतील कितवे अनुच्छेद राष्ट्रपतींनी आदेशाद्वारे जीएसटी कौन्सिल स्थापन करावे अशी तरतूद करते?

1) अनुच्छेद 101 2) अनुच्छेद 279

3) अनुच्छेद 278-A 4) अनुच्छेद 279-A

---

4) पुढीलपैकी कोणते राज्य 'ईशान्य परिषदेचे' सदस्य-राज्य नाही?

अ) सिक्कीम ब) अरूणाचल प्रदेश क) आसाम

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ, क 4) यापैकी नाही

---

5) 'राष्ट्रीय आणीबाणी' लागू असतांना राष्ट्रपती घटक राज्यांकरिता...

1) केवळ संघ सूचीतील विषयांबाबतच वटहुकूम काढू शकतात.

2) राज्य सूचीतील विषयांबाबतही वटहुकूम काढू शकतात.

3) राज्य सूचीतील विषयांबाबत वटहूकूम काढू शकत नाहीत.

4) केवळ संघ आणि समवर्ती सूचीतील विषयांबाबतच वटहुकूम काढू शकतात.

---

6) उपराष्ट्रपती काही काळाकरिता राष्ट्रपती पदाचा कार्यभार कोणत्या वेळी सांभाळू शकतात?

अ) राष्ट्रपतींनी आपल्या पदाचा कार्यकाळ संपवल्यानंतर नवीन राष्ट्रपतींची नेमणूक न झाल्यास.

ब) राष्ट्रपतींनी राजीनामा दिल्यास.

क) राष्ट्रपतींची बडतर्फी झाल्यास.

1) फक्त अ 2) फक्त क 3) ब, क 4) अ, ब, क

7) –'सहकार' हा विषय जिल्हा परिषदेकडून राज्य शासनाकडे हस्तांतरित करावा.

– ग्रामपंचायत स्थापनेकरिता किमान लोकसंख्या 500 इतकी असावी.

–'उपमुख्य कार्यकारी अधिकारी' हे पद निर्माण करावे.

– महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेसंबंधीच्या या शिफारशी कोणत्या समितीने केल्या आहेत?

1) ल. ना. बोंगिरवार समिती 2) वसंतराव नाईक समिती

3) पी. बी. पाटील समिती 4) बलवंतराय मेहता समिती

---

8) भारतीय संविधानात 'मार्शल लॉ' ची व्याख्या आणि त्यासंबंधीच्या मुलभूत हक्कांची तरतूद घटनेच्या कितव्या अनुच्छेदांतर्गत करण्यात आलेली आहे?

1) अनुच्छेद 33 2) अनुच्छेद 34 3) अनुच्छेद 35 4) यापैकी नाही

---

9) लोकसभा विसर्जित झाल्यानंतर कोणते प्रलंबित विधेयक व्यपगत (Lapse) होणार नाही?

अ) जे विधेयक लोकसभेत प्रलंबित आहे.

ब) लोकसभेने पारित केलेले परंतु राज्यसभेत प्रलंबित असलेले विधेयक

क) लोकसभा विसर्जनाआधी ज्या विधेयकाकरिता 'संयुक्त अधिवेशन' बोलावण्याची सूचना राष्ट्रपतींनी केली आहे असे विधेयक

1) ब, क 2) फक्त क 3) फक्त ब 4) अ, क

---

10) महाराष्ट्रातील ग्रामपंचायत सदस्याच्या अपात्रतेमुळे एखादी जागा रिक्त झाली आहे किंवा नाही असा प्रश्न उद्भवल्यास त्याबाबत कुणाचा आदेश अंतिम असतो?

1) जिल्हाधिकारी 2) विभागीय आयुक्त

3) तहसिलदार 4) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी

---

11) पुढीलपैकी कोणत्या राज्यामध्ये पाचव्या परिशिष्ट प्रदेशांचा (Fifth Schedule Areas) समावेश नाही?

अ) महाराष्ट्र ब) गुजरात

क) तामिळनाडू ड) मध्य प्रदेश

1) फक्त क 2) फक्त ड 3) ब, क 4) अ, क

---

12) घटक राज्यांच्या विधिमंडळांच्या निवडणुकींबाबत कायदे करण्याचा अधिकार पुढीलपैकी कोणला असतो?

अ) संसद ब) राज्य विधिमंडळे क) राज्य शासन

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ, ब 4) ब, क

---



DeccanIAS

13) संसदेत कुठलीही अनुदानाची मागणी (demand for grant) करण्यासाठी कुणाची शिफारस आवश्यक असते?

1) लोकसभेचे सभापती
2) राज्यसभा अध्यक्ष
3) राष्ट्रपती
4) दोन्ही 1 आणि 2

---

14) 'भारतीय राष्ट्रीय सभेच्या' (INC) स्थापनेमागचा 'सुरक्षा झडप सिद्धांत' पुढीलपैकी कोणी नाकारला होता?

अ) सी.एफ.अँड्र्यूज ब) योगेशचंद्र बॅनर्जी क) आर.सी.मुजुमदार

1) फक्त ब 2) फक्त क 3) अ, क 4) यापैकी नाही

---

15) चुकीची जोडी ओळखा.

| संस्था | | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| 1) मद्रास नेटिव्ह असोसिएशन | – | 1852 |
| 2) ईस्ट इंडिया असोसिएशन | – | 1866 |
| 3) पूना असोसिएशन | – | 1877 |
| 4) ब्रिटीश इंडियन असोसिएशन | – | 1851 |

---

16) सन 1896 मध्ये कोणत्या उद्देशाने 'वेल्बी कमिशनची' स्थापना करण्यात आली होती?

1) भारतातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती जाणून घेण्याकरिता
2) रेल्वे उद्योगाच्या वाढीकरिता
3) हिंदुस्थानच्या जमाखर्चाची तपासणी करण्याकरिता
4) भारतातील विद्यापीठांची स्थिती जाणून घेण्याकरिता

---

17) –'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' आणि 'देशबांधवांची उन्नती' ही या संस्थेची ध्येये होती.
– 'दुःखनिवारण' आणि 'समाजसेवा' हे या संस्थेच्या कामाचे स्वरूप ठरवले गेले होते.
– मद्रास, नागपूर, मुंबई, कटक येथे या संस्थेच्या शाखा होत्या.

ही संस्था कोणती?

1) भारत सेवक समाज
2) प्रार्थना समाज
3) बॉम्बे असोसिएशन
4) ज्ञानप्रसारक मंडळी

---

18) स्वराज्य पक्षात मतभेद झाल्यानंतर खालीलपैकी कोणी 'नॅशनॅलिस्ट पक्षाची' स्थापना केली होती?

1) सी. आर. दास
2) लाला लजपतराय
3) सरदार पटेल
4) विठ्ठलभाई पटेल

DeccanIAS

19) चुकीची जोडी ओळखा.

| व्हाईसरॉय | | आयोग |
|---|---|---|
| 1) लॉर्ड कर्झन | – | अँथनी |
| 2) लॉर्ड लिटन | – | स्ट्रॅची |
| 3) जॉन लॉरेन्स | – | स्मिथ आयोग |
| 4) लॉर्ड वेव्हेल | – | वुडहेड |

20) स्वदेशी आंदोलनादरम्यान बंगाल नॅशनल कॉलेज' स्थापन झाले होते, त्याचे अध्यक्ष कोण होते?

1) अरविंद घोष
2) रवींद्रनाथ टागोर
3) सुभाषचंद्र बोस
4) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

21) 'शुभसूचक' हे वृत्तपत्र महाराष्ट्रातील कोणत्या भागातून निघत होते?

1) पुणे
2) सातारा
3) कोल्हापूर
4) रत्नागिरी

22) योग्य जोड्या जुळवा.

अ) बाल व्याकरण — 1) दादोबा पांडुरंग तर्खडकर
ब) धर्म विवेचन — 2) बाळशास्त्री जांभेकर
क) 'रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या जर्नलमध्ये लेखन — 3) न्या. रानडे
ड) 'साधकाचा विश्वास' — 4) भाऊ दाजी लाड

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 1 | 3 | 4 |
| 2) | 2 | 1 | 4 | 3 |
| 3) | 1 | 2 | 4 | 3 |
| 4) | 1 | 2 | 3 | 4 |

23) म. फुले यांचे धर्मचिंतन पुढीलपैकी कोणत्या संहितांमधून प्रकट झाले आहे?

अ) 'अखंडादी काव्यरचना'
ब) 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक'
क) 'ब्राम्हणांचे कसब'

1) फक्त ब
2) अ, ब
3) ब, क
4) अ, ब, क



DeccanIAS

24) पुढीलपैकी कोणत्या व्यक्तीचा 'सत्यशोधक समाजाशी संबंध नव्हता?

अ) ग्यानोबा ससाणे     ब) ताराबाई शिंदे     क) पंडित नामदेव कुंभार

ड) खंडेराव बागल     इ) वासुदेव बिर्जे

1) ब, ड     2) फक्त ब     3) अ, क, इ     4) यापैकी नाही

---

25) नलिनी पंडित यांनी 'भांडवलदारी युगाचा महाराष्ट्रातील अग्रदूत' असे कोणाचे वर्णन केलेले आहे?

1) गणेश वासुदेव जोशी     2) रा. वि. मंडलिक

3) जगन्नाथ शंकरशेट     4) फिरोजशहा मेहता

---

26) 'हिंदू-हिंदूंचे संकरविवाह' या लेखाद्वारे लोकमान्य टिळकांनी कशाला विरोध केला होता?

1) सजातीय विवाहाला     2) आंतरजातीय विवाहाला

3) ब्राम्हण्याला     4) यापैकी नाही

---

27) करवीर पीठाचे शंकराचार्य म्हणून शाहूंनी सन 1917 मध्ये कोणाची नेमणूक केली होती?

1) डॉ. कुर्तकोटी     2) सदाशिव लक्ष्मण पाटील

3) भास्करराव जाधव     4) शं. ब. भोसले

---

28) अब्दुल अजीज आणि बरेलीचे सय्यद अहमद यांचा खालीलपैकी कोणत्या आंदोलनाशी संबंध होता?

1) देवबंद चळवळ     2) अलीगड चळवळ

3) वहाबी आंदोलन     4) पाकिस्तान निर्मिती चळवळ

---

29) महाराष्ट्रातील पुढीलपैकी कोणते जिल्हे सलग दोन राज्यांना लागून आहेत?

अ) नांदेड     ब) पालघर     क) सिंधूदुर्ग

ड) नंदूरबार     इ) भंडारा     फ) गोंदिया

1) अ, क, ड, इ     2) अ, ब, क, ड

3) अ, ब, क, ड, फ     4) अ, क, ड, इ, फ

---

30) कोकण प्रशासकीय विभागात एकूण ....... जिल्हे तर अमरावती विभागात ......... जिल्हे आहेत.

1) 6, 5     2) 7, 6     3) 7, 5     4) 8, 6

---




DeccanIAS

31) 1 मे 1961 पूर्वी महाराष्ट्रात एकूण 26 जिल्हे होते त्यानंतर पुढीलपैकी नव्याने नावारूपास झालेले जिल्हे कोणते आहेत?

1) लातूर, धुळे
2) पालघर, गोंदिया, परभणी
3) हिंगोली, वाशीम, लातूर, भंडारा
4) हिंगोली, पालघर, गडचिरोली

---

32) पुढे दिलेल्या कोल्हापूरच्या नकाशामध्ये पन्हाळ्याची डोंगररांग कोणत्या ठिकाणी वसलेली आहे?




1) अ
2) ब
3) क
4) ड

---

33) जोड्या जुळवा.

| **घाट** | **जोडलेली जिल्हे** |
|---|---|
| अ) माळशेज | 1) पुणे-सातारा |
| ब) वरंधा | 2) महाड-पुणे |
| क) खंबाटकी | 3) सावंतवाडी-बेळगाव |
| ड) आंबोळी | 4) ठाणे-नगर |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 2 | 3 | 1 |
| 2) | 4 | 2 | 1 | 3 |
| 3) | 3 | 2 | 1 | 4 |
| 4) | 4 | 3 | 2 | 1 |

---

34) योग्य विधाने निवडा.

अ) अक्षवृत्ते (Latitude) धृवांकडे जावे तसतसे लहान होत जातात मात्र सर्व रेखावृत्ते आकाराने सारखीच आहेत.

ब) कोणत्याही दोन रेखावृत्तां (Longitude) दरम्यानचे अंतर हे उत्तरेला व दक्षिणेला जावे तसतसे बदलत जाते.

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही अ आणि ब
4) दोन्ही नाही

---



DeccanIAS

35) अयोग्य जोडी ओळखा.

| जिल्हा | | तलाव |
|---|---|---|
| 1) नागपूर | – | अंबाझरी |
| 2) भंडारा | – | चांदपूर |
| 3) चंद्रपूर | – | उमरझरी |
| 4) गडचिरोली | – | तुलतुली |

---

36) टिपेश्वर हे पैनगंगा नदीच्या खोऱ्यात, विदर्भाच्या मोक्याच्या भागात ... जिल्ह्यात वसलेले अभयारण्य आहे.

1) अकोला 2) यवतमाळ 3) वाशिम 4) चंद्रपूर

---

37) भारतातील कायनाईटच्या एकूण उत्पादनापैकी 15% उत्पादन महाराष्ट्रात होते. कायनाईटचे प्रमुख साठे कोठे आहेत ते ओळखा.

1) भंडारा जिल्ह्यात साकोळी, पोहरा, पिंपळगाव 2) चंद्रपूर जिल्ह्यात वसावा व दुबारपेठ

3) नागपूर जिल्ह्यात रामटेक, सावनेर इ. 4) चंद्रपूर जिल्ह्यात राजूरा, वडोदा

---

38) रायगड जिल्ह्यातील उरण व रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ प्रकल्प हे ... विद्युत प्रकल्प आहेत.

1) अणूआधारित 2) जलआधारित 3) नॅचरल गॅस आधारित 4) पवन आधारित

---

39) NH-44 संबंधी योग्य विधाने निवडा.

अ) या महामार्गाची लांबी 3245 कि.मी. आहे.

ब) हा भारतातील सर्वात लांब महामार्ग आहे.

क) हा महामार्ग श्रीनगरवरून निघतो व नागपूर-बंगळुरू या शहरांना जोडत पुढे कन्याकुमारीला जातो.

1) फक्त अ 2) अ, क 3) ब, क 4) अ, ब, क

---

40) महाराष्ट्रात होणाऱ्या एकूण स्थलांतरापैकी कर्नाटक व गुजरात राज्यातून होणाऱ्या स्थलांतरात ...

1) स्त्रियांपेक्षा पुरुषाचे प्रमाण जास्त आहे. 2) पुरुषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

3) बालकांचे प्रमाण जास्त आहे. 4) स्त्रियांचे प्रमाण पुरुषापेक्षा दुप्पट आहे.

DeccanIAS

41) 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वाधिक लोकसंख्येने असणारी आदिवासी जमात कोणती जी एकूण जमातीच्या (ST) लोकसंख्येपैकी 24% इतकी आहे.

1) ठाकर 2) गोंड 3) कोळी 4) भिल्ल

---

42) लक्षद्विप आणि मालदिव हे पुढीलपैकी कोणत्या रेखावृत्ताने विलग झाले आहेत?

1) $10^0$ उत्तर रेखावृत्त 2) $9^0$ उत्तर रेखावृत्त 3) $8^0$ उत्तर रेखावृत्त 4) डंकन पॅसेज

---

43) सातारा येथे ...... नदीवर महाबळेश्वरजवळ लिंगमळा धबधबा आहे.

1) वेण्णा 2) सावित्री 3) कोयना 4) गायत्री

---

44) 2011-12 सालच्या अर्थसंकल्पामध्ये प्रथमच वापरण्यात आलेली 'प्रभावी महसूली तूट' (Effective Revenue Deficit) ही संकल्पना खालीलपैकी कशामुळे वापरात आणली गेली?

अ) केंद्राकडून राज्यांना भांडवली संपत्ती (Capital Assets) निर्माण करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानांचा केंद्राच्या भांडवली तुटी (Capital Deficit) वर परिणाम होत होता.

ब) या अनुदानांमधून निर्मित भांडवली संपत्तीवर अंतिमतः केंद्र शासनाचीच मालकी असते.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) एकही नाही

---

45) खालीलपैकी कोणत्या पिकाची किमान किंमत जाहीर करण्याची कायदेशीर (Statutory) जबाबदारी ही केंद्रशासनावर असते?

1) कापूस 2) ऊस 3) ताग 4) तेलबिया

---

46) चलनवाढ होत असताना प्रामुख्याने–

अ) बाँड्समधील गुंतवणुकदारांना लाभ होतो.

ब) शेअर्समधील गुंतवणुकदारांना नुकसान होते.

1) फक्त अ बरोबर 2) फक्त ब बरोबर 3) दोन्ही बरोबर आहेत 4) एकही बरोबर नाही

---

47) आंतरराज्य व्यापारादरम्यान एखादी वस्तू महाराष्ट्रातील विक्रेत्याने कर्नाटकमधील खरेदीदारास विकली; तर यावर IGST लागतो. या करापैकी–

1) अर्धा हिस्सा केंद्र शासन स्वतःकडे ठेवेल आणि अर्धा हिस्सा महाराष्ट्रास मिळेल.

2) अर्धा हिस्सा केंद्रशासन स्वतःकडे ठेवेल आणि अर्धा हिस्सा कर्नाटक राज्यास मिळेल.

3) सगळा कर केंद्रशासन स्वतःकडे ठेवेल.

4) केंद्रशासन हे अर्धा हिस्सा महाराष्ट्रास तर अर्धा हिस्सा कर्नाटकास विभागून देईल.

---



DeccanIAS

48) लघुवित्त बँकांच्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?

अ) किमान भागभांडवलाची मर्यादा ही ₹ 100 कोटी इतकी असते.

ब) RBI चे CRR आणि SLR चे निकष पाळावे लागत नाहीत.

क) गैर-बँकिंग वित्तीय सेवा (Non-Banking Financial Services) देण्यासाठी संलग्न संस्था स्थापन करता येत नाही.

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) सर्व

---

49) जनगणना 2011 नुसार सर्वाधिक बाललिंगगुणोत्तर (Child Sex Ratio) असणारा जिल्हा .......... राज्यात आहे, तर सर्वात कमी बाललिंगगुणोत्तर असणारा जिल्हा ........ राज्यात आहे.

1) हिमाचल प्रदेश, हरियाणा 2) अरूणाचल प्रदेश, हरियाणा

3) अरूणाचल प्रदेश, पंजाब 4) हिमाचल प्रदेश, पंजाब

---

50) 'अटल पेन्शन योजना' ही खालीलपैकी कोणत्या लाभार्थीगटासाठी सुरू करण्यात आली आहे?

1) वयोवृद्ध 2) संघटित क्षेत्रातील कामगार

3) असंघटित क्षेत्रातील कामगार 4) वरीलपैकी एकही नाही

---

51) 'राष्ट्रीय उत्पन्न' म्हणजे-

1) दरडोई GDP

2) क्रयशक्ती समानता तत्त्वावरील दरडोई GNI (GNI per capita at PPP)

3) घटक किंमतीवरील निव्वळ देशांतर्गत उत्पाद (NDP at factor cost)

4) घटक किंमतीवरील निव्वळ राष्ट्रीय उत्पाद (NNP at factor cost)

---

52) खालीलपैकी कोणता अप्रत्यक्ष कर निकोलस कॅल्डॉर यांच्या शिफारशीवरून लागू करण्यात आला होता?

1) खर्च कर (Expenditure Tax) 2) मालमत्ता कर (Estate Duty)

3) देणगी कर (Gift Tax) 4) वरीलपैकी एकही नाही

---

53) 2017 मध्ये WTO ने दिलेल्या आकडेवारीनुसार-

अ) एकूण 'सेवा GDP ' संदर्भात भारताचा जगात 13 वा क्रमांक होता.

ब) 1997-98 पासून भारताच्या GDP वृद्धीदरापेक्षा भारताच्या 'सेवा GDP' चा वृद्धीदर हा सतत अधिक राहिला आहे.

क) 2017 साली भारताच्या GDP मधील सेवाक्षेत्राचा वाटा 48.9% होता.

1) फक्त अ, ब बरोबर 2) फक्त ब, क बरोबर 3) फक्त अ, क बरोबर 4) सर्व बरोबर

---



DeccanIAS

54) योग्य विधाने ओळखा.

अ) 'चलन, नाणी आणि टांकसाळ' (Currency, coinage and mint) हा केंद्रशासनाच्या भांडवली जमे (Capital Receipts) चा एक भाग आहे.

ब) 'भविष्य निर्वाह निधी' (Provident Fund) हा केंद्रशासनाच्या गैर-कर महसुली जमेचा (non-tax revenue receipts) भाग आहे.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब दोन्ही 4) एकही नाही

---

55) बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्या विविध आयामांपैकी 'संपत्ती' (assets) या आयामाचा भार 1/18 इतका आहे. 'संपत्ती' या आयामासाठी एखादे कुटुंब तेव्हा वंचित (deprived) समजले जाते; जेव्हा की-

अ) कुटुंबाकडे रेडिओ, टी. व्ही., टेलिफोन, कॉम्प्युटर, बैलगाडी (animal cart), सायकल, मोटारसायकल आणि फ्रिज यांपैकी एकापेक्षा अधिक वस्तू नसतील.

ब) कुटुंबाकडे कार नसेल.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही

---

56) सार्वजनिक क्षेत्र उपक्रमाचे (PSUs) निर्गुंतवणुकीकरिता 'धोरणात्मक' (Strategic) आणि 'गैर-धोरणात्मक' (non-strategic) असे वर्गीकरण खालीलपैकी कोणत्या वर्षी करण्यात आले?

1) 1991 2) 1993 3) 1999 4) 2002

---

57) HPI (House Price Index) या नावाचा गृहकिंमत निर्देशांक खालीलपैकी कोणती संस्था प्रकाशित करते?

1) National Housing Board (NHB)
2) Reserve Bank of India (RBI)
3) 1 आणि 2 दोन्ही
4) वरीलपैकी एकही नाही

---

58) योग्य विधाने ओळखा.

अ) सहाव्या पंचवार्षिक योजनेचा आधार म्हणजे 'ब्रम्हानंद आणि वकील' प्रतिमान होय.

ब) 'ब्रम्हानंद आणि वकील' प्रतिमानास 'मजुरी वस्तू प्रतिमान' (Wage goods model) असे म्हणतात.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही

---

59) ....... हा देश पदवीस्तरीय (graduate- level) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विषयाधारित संशोधन विद्यापीठ स्थापन करणारा जगातील प्रथम देश ठरला.

1) दक्षिण कोरिया
2) संयुक्त अरब आमिराती (UAE)
3) कॅनडा
4) ऑस्ट्रेलिया

---



DeccanIAS

60) कोणत्या राज्यात भारतातील एकूण 'ग्रॅफाइट'च्या साठ्यापैकी (Graphite) 35% साठे असल्याचे आढळून आले आहे?

1) आंध्र प्रदेश
2) राजस्थान
3) हिमाचल प्रदेश
4) अरूणाचल प्रदेश

---

61) 'मेरा इंडिया' (MERA India) उपक्रम ......... ह्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे.

1) कुष्ठरोग निर्मूलन
2) बालविवाह रोखणे
3) स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध
4) मलेरिया निर्मूलन

---

62) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

1) भारतीय हवाई दलातील 'मिग-27' विमानांना 'बहादूर' या नावाने ओळखले जाई.
2) डिसेंबर 2019 मध्ये 'मिग-27' विमाने भारतीय हवाई दलातून निवृत्त झाली.
3) बंगळुरू येथील हवाई तळावरून 'मिग-27' विमानाने शेवटचे उड्डाण केले.
4) यापैकी एकही नाही.

---

63) ........... या रेल्वेमार्गावर धावणाऱ्या 'तेजस एक्स्प्रेस'ने 19 ऑक्टोबर 2019 रोजी झालेल्या विलंबापोटी (for late running) प्रवाशांना नुकसान भरपाई दिली होती.

1) दिल्ली-कटारा
2) अमृतसर-दिल्ली
3) दिल्ली-जयपूर
4) दिल्ली-लखनऊ

---

64) इंटरनेट क्षेत्रातील कंपन्यांनी देशांतर्गत केलेल्या व्यवसायावर कर आकारणारा ...... हा जगातील पहिला देश ठरला आहे.

1) जपान
2) फ्रान्स
3) चीन
4) जर्मनी

---

65) 'रिलेंटलेस' (Relentless) हे ......... यांचे आत्मचरित्र आहे.

1) जसवंत सिंह
2) शत्रुघ्न सिन्हा
3) यशवंत सिन्हा
4) कपिल देव

---

66) 2019 च्या 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' विजेत्यांमध्ये एका भारतीय व्यक्तीचा समावेश आहे, त्यांनी ...... या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी मुळे त्यांना हा बहुमान देण्यात आला.

1) साहित्य
2) प्रशासन
3) पत्रकारिता
4) वैद्यकीय सेवा

---



DeccanIAS

67) सप्टेंबर 2019 मध्ये 'आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर' (ISS) गेलेले 'हज्जा-अल-मन्सौरी' हे कोणत्या देशाचे नागरिक आहेत?

1) संयुक्त अरब आमिराती (UAE)
2) सौदी अरेबिया
3) इराण
4) कतार

---

68) कोणते राज्य ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिव्यांग व्यक्तींना आरक्षण देणारे भारतातील पहिले राज्य ठरले?

1) राजस्थान
2) हिमाचल प्रदेश
3) तेलंगणा
4) छत्तीसगढ

---

69) खालील विधाने विचारात घ्या.

अ) 'महाराष्ट्र मीडीया पर्सन अँण्ड मीडिया इन्स्टिट्युशन्स, 2017' या कायद्याला नोव्हेंबर 2019 मध्ये राष्ट्रपतींनी संमती दिली.

ब) पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा पारित करणारे कर्नाटक हे भारतातील प्रथम राज्य आहे.

क) कर्नाटक व राजस्थान नंतर पत्रकारांसाठी संरक्षण कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे भारतातील तिसरे राज्य ठरले.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त?

1) फक्त ब
2) अ आणि क
3) फक्त अ
4) अ, ब, आणि क

---

70) ऑक्सफर्ड शब्दकोशाने या वर्षातील सर्वाधिक वापराचा शब्द (Oxford Word of the Year 2019) म्हणून कोणता शब्द जाहीर केला आहे?

1) क्लायमेट इमर्जन्सी (Climate Emergency)
2) टॉक्सिक (Toxic)
3) युथ क्वेक (Youth Quake)
4) पोस्ट ट्रूथ (Post Truth)

---

71) महिलांवरील अत्याचारांना आणि हल्ल्यांना प्रतिबंध घालण्यासाठी कोणत्या राज्याने 'दिशा' विधेयक पारित केले?

1) हरयाणा
2) मध्यप्रदेश
3) आंध्रप्रदेश
4) छत्तीसगढ

---



DeccanIAS

72) स्पेनमधील 'ला लीगा' (La Liga) या फुटबॉल स्पर्धेचा भारतातील 'ब्रॅण्ड ॲम्बेसेडर' म्हणून कोणाची निवड करण्यात आली आहे?

1) सुनिल छेत्री
2) रोहित शर्मा
3) सचिन तेंडूलकर
4) गुरप्रित सिंह संधू

---

73) सोरेनसेन या डॅनिश शास्त्रज्ञाने ...... ही संकल्पना मांडली.

1) कार्बन संयुग
2) आयडीयल गॅस इक्वेशन
3) pH
4) सजिवांचे वर्गीकरण

---

74) वनस्पतींना प्रकाश ऊर्जेचे रूपांतर रासायनिक ऊर्जेत करण्यासाठी पुढीलपैकी कोणता पोषक घटक आवश्यक आहे?

1) नायट्रोजन
2) फॉस्फरस
3) मॅग्नेशिअम
4) झिंक

---

75) पुढे दिलेल्या पर्यायापैकी विसंगत पर्याय ओळखा.

1) मुंगी (Ant)
2) कातींग (Spider)
3) माशी (Houseflies)
4) ढेकूण (bedbug)

---

76) पुढे दिलेल्या गुणधर्मापैकी कोणते गुणधर्म आम्ला(Acid)शी साधर्म्य साधतात?

अ) ते पाण्यात विरघळल्यानंतर $H^+$ देतात.

ब) त्यांच्यामध्ये इलेक्ट्रॉन गमावण्याची शक्ती असते.

क) सर्व आम्ल पाण्यात द्रवणीय असतात.

1) फक्त अ
2) अ, ब
3) अ, क
4) अ, ब, क

---

77) $CH_3 - C \equiv C - CH_3$ या संयुगाचे नाव ओळखा.

1) ब्यूटेन
2) ब्यूटाइन
3) आयसोब्यूटेन
4) ब्यूटीन

---

78) DNAच्या रचनेसंबंधी पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने निवडा.

1) पंच शर्करा + नत्ररेणू = न्यूक्लिओसाईड
2) हेक्झोस शर्करा + ॲडेनाईन = न्यूक्लिओसाईड
3) अष्ट शर्करा + फॉस्फेट = न्यूक्लिओटाईड
4) पंच शर्करा + फॉस्फेट = ॲडेनाइन



DeccanIAS

79) पुढीलपैकी कोणत्या उती (Tissue) ह्या सरल उती (Simple Tissue) आहेत?

अ) चेता उती (Nerves Tissue)
ब) अभिस्तर उती (Epithelial Tissue)
क) संयोजी उती (Connective Tissue)
ड) स्नायू उती (Muscle Tissue)
इ) ग्रंथील अभिस्तर उती (Glandular Epithelial Tissue)

1) अ, ब, इ
2) ब, ड
3) ब, इ
4) वरीलपैकी एकही नाही

---

80) समपृष्ठरज्जू प्राणी म्हणजेच संघ कॉर्डाटा (Phylum Chordata) मधील प्राणी यांची वैशिष्ट्ये ओळखा.

अ) या प्राण्यांना श्वसनासाठी कल्लाविदरे किंवा फुप्फुसे असतात.
ब) शरीराचे डोके, मान, धड व शेपूट या चार भागात विभाजन झालेले असते.
क) हे प्राणी शीत किंवा कोष्ण रक्ताचे असतात.(cold or warm blooded)

1) अ, क
2) ब, क
3) अ, ब, क
4) फक्त ब

---

81) एखाद्या किरणोत्सारी मूलद्रव्यातून $\beta$ कण निर्गमीत झाल्यास....

अ) त्या मूलद्रव्याचे अणूवस्तूमान बदलते.
ब) त्या मूलद्रव्याचा अणूअंक वाढतो.
क) त्या मूलद्रव्याचा अणूअंक कमी होतो.

1) अ, ब
2) अ, क
3) फक्त अ
4) फक्त ब

---

82) पुढीलपैकी कोणत्या वेळी लिफ्टमधील व्यक्तीला आपले वजन शून्य झाल्यासारखे वाटेल?

1) जेव्हा लिफ्ट विशिष्ट त्वरणाने वर जाईल.
2) जेव्हा लिफ्ट विशिष्ट त्वरणाने खाली येईल.
3) मुक्त पतन अवस्था
4) जेव्हा लिफ्टचे त्वरण गुरुत्व त्वरणापेक्षा कमी असेल.

---

83) ध्वनी लहरी या ....... लहरी आहेत.

1) अनुतरंग (longitudinal)
2) अवतरंग (Transverse Wave)
3) अयांत्रिक लहरी (Non Mechanical Wave)
4) वरील सर्व

---

84) पुढीलपैकी कोणता/ते वाहक हा अतिवाहक (Super Conductor) म्हणून ओळखला जातो?

1) पारा
2) शिसे
3) कथिल
4) वरील सर्व

---



DeccanIAS

85) एका माणसाने एका कड्यासमोर उभे राहून आरोळी ठोकली, तेव्हा त्याला 1.2 सेकंदाने प्रतिध्वनी ऐकू आला. ध्वनीचा हवेतील वेग 340 मी/से. असल्यास तो माणूस व कडा यांमधील अंतर काढा.

1) 272 मी. 2) 204 मी. 3) 408 मी. 4) 283 मी.

---

86) विशिष्ट तापमानास वाहकाचा रोध (R) हा कोणकोणत्या बाबींवर अवलंबून असेल?

अ) वाहकपदार्थ (Material)


ब) वाहकाची लांबी

क) काटछेदी क्षेत्रफळ (Crosssectional Area)

1) अ, ब, क 2) ब, क 3) फक्त ब 4) अ, क

---

87) खालील आकृतीमधील रेखांकित भागांचे क्षेत्रफळ दर्शविणारा पर्याय निवडा.




1) $16-\pi$

2) $2-2\pi$

3) $16-4\pi$

4) $4-\pi$


---

88) जर 9 मोसंबीची किंमत 5 संत्र्याच्या किंमतीएवढी आहे. 5 संत्र्यांची किंमत 3 सिताफळांच्या किंमतीएवढी आहे, 4 सिताफळांची किंमत ही 9 सफरचंदाच्या किंमतीएवढी आणि 3 सफरचंदाची किंमत ही ₹ 48 आहे, तर एका मोसंबीची किंमत किती आहे?

1) ₹ 9 2) ₹ 18 3) ₹ 12 4) ₹ 27

---

89) खालील आकृतीमध्ये X ची किंमत दर्शविणारा पर्याय निवडा.




1) $51^0$

2) 360/7

3) 44/7

4) 347/7

90) खालील शृंखलेमध्ये प्रश्नचिन्हाच्या जागी असणारा अचूक पर्याय निवडा.

BCYX, EFVU, HISR, KLPO, ?

1) NOML 2) NOLM 3) ONML 4) ONLM

---

91) एका वन्यजीव अभयारण्यामध्ये वाघ, बिबटे, व हरिण यांचे प्रमाण 5:12:17 इतके आहे. जर बिबटे आणि वाघ यांच्या संख्येमधील फरक हा 5 आणि 7 या संख्यांनी पुर्ण भाग जाणाऱ्या संख्येएवढा आहे. तर या अभयारण्यामधील या तीन प्राण्यांची कमीत कमी शक्य असणारी संख्या दर्शवणारा पर्याय निवडा.

1) 185 2) 190 3) 170 4) सांगता येत नाही

---


92) खालील शृंखलेमधील रिकाम्या जागी खालीलपैकी कोणती शृंखला सर्वात योग्य आहे?

b d a b c d b d a b c d _ d a b c d b _ a b c d b d _

1) b c d 2) b d a 3) b d c 4) c d a

---

93) खालील आकृतीमध्ये प्रत्येक शेजारच्या ब्लॉकमध्ये वेगवेगळा रंग द्यायचा झाल्यास कमीत कमी किती रंग देणे शक्य आहे?



1) 3

2) 4

3) 5

4) 6

---

94) एका तांब्याच्या तारेला वाकवून 121 $cm^2$ चा एक चौरस तयार होतो, जर त्याच तारेचे वर्तुळ तयार केले तर त्या वर्तुळाचे क्षेत्रफळ किती असेल?

1) 121 $cm^2$ 2) 242 $cm^2$ 3) 154 $cm^2$ 4) 66 $cm^2$

---

95) जर 3 पुरूष किंवा 4 स्त्रिया एक काम 43 दिवसात पुर्ण करतात तर 7 पुरूष आणि 5 स्त्रिया मिळून तेच काम किती दिवसात पुर्ण करतील?

1) 11 2) 10 3) 12 4) 9

---

96) एका निसर्ग संवर्धनतज्ञास, त्याच्या एका बेडकाच्या प्रजातीस बचाव करण्याच्या मोहिमेसाठी लोकांचा कमी पाठिंबा मिळाला. त्यांनी असे सांगितले की या मोहिमेने त्या प्राण्यांच्या(बेडकाच्या) पर्यावरणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला आहे. लोक प्राण्यांना (बेडूक) वाचवण्यास फारसे उत्सुक नाहीत कारण या प्राण्यांना ते अप्रिय प्राणी समजतात आणि लोकांना क्वचितच या प्राण्यांबद्दल उत्कट भावना वाटते आणि त्यांच्याकडे कोणतेही सकारात्मक कारण नाही.

पुढीलपैकी कोणत्या निरीक्षणाद्वारे तज्ञांचे मत अधिक बळकट होईल?

1) पर्यावरणीय संवर्धन ही या प्रदेशातील वाढती महत्त्वाची चिंता आहे.
2) अप्रिय वाटणाऱ्या वटवाघळांच्या कार्टूनला स्थानिक फुटबॉल संघाचा शुभंकर म्हणून स्वीकारल्यानंतरच वटवाघळांना वाचवण्याच्या मोहिमेने काही प्रमाणात यश मिळवले.
3) मानवी अतिक्रियशिळतेमुळे या भागात साप आणि सरडे यांनाही संरक्षणाची आवश्यकता आहे.
4) बेडकांपासून बचाव करण्याची मोहीम पाच वर्षांपासून अस्तित्त्वात आहे आणि तरीही बेडकांची संख्या कमी होत आहे.

---

97) छायाचित्रण आता यापुढे एक कला प्रकार राहिला नाही. आजकाल प्रत्येकाकडे डिजिटल कॅमेरा आहे ज्यामध्ये एक परिपूर्ण प्रतिमा मिळवण्यासाठी करण्यासाठी केवळ या विषयाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

या युक्तिवादाचा लेखक असे स्पष्टपणे गृहीत धरतो, की

1) विषयाची निवड ही छायाचित्रणातील महत्त्वाचा कलात्मक घटक नाही.
2) डिजिटल कॅमेरा गुणवत्तेत सतत सुधारत राहील.
3) डिजिटल कॅमेरे कधीही चुकत नाहीत.
4) इतर सर्व प्रकारच्या कॅमेऱ्यासह छायाचित्रण करणे ही एक कला आहे.

---

98) उत्तर भारतामध्ये यावर्षी डेंग्यू तापाचे (संसर्ग झालेल्या डासांच्या चाव्याद्वारे संक्रमित झाला आहे) निदान झालेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत दुप्पट आहे. या भागात डासांची संख्या नियंत्रित करण्याचे उपाय अयशस्वी झाल्याचा निष्कर्ष अधिकाऱ्यांनी काढला आहे.

पुढीलपैकी सर्व विधाने खरी असल्यास, अधिकाऱ्यांचा दाव्यावर शंका निर्माण न करणारे विधान निवडा...

1) प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ झाल्यामुळे आता आणखी प्रकरणे नोंदवली गेली आहेत.

2) नुकतीच शेजारच्या देशांकडून परत आलेल्या लोकांमध्ये या प्रकरणांचे प्रमाण खूप जास्त आहे.

3) एक प्रभावी निदान चाचणी सुमारे नऊ महिन्यांपूर्वी सुरू केली गेली.

4) मलेरियाचे प्रमाण (दर हजारो प्रकरणांची संख्या) देखील डासांच्या चाव्याद्वारे होण्याची शक्यता वाढली आहे.

---

99) खालील विधाने काळजीपूर्वक अभ्यासा.

**विधाने :–**

अ) काही झाडे वेली आहेत.

ब) काही वेली फुले आहेत.

क) एकही फूल फळ नाही.

**निष्कर्ष :–**

I) एकही फळ वेली नाही.

II) एकही फुल हे झाड नाही.

III) काही वेली या फळे नाहीत.

पर्याय :-

1) I, II आणि III

2) फक्त I आणि II

3) फक्त III

4) फक्त II आणि III

---

100) एका आंतरराष्ट्रीय परिषदेला 100 लोक उपस्थीत होते. त्यातील 70% भारतीय होते. जर त्या परिषदेतील उपस्थीत लोकांपैकी 60% लोक शाकाहारी आहेत, तर खालील विधानांपैकी कोणते विधान/ने असत्य नाहीत?

अ) त्या परिषदेला उपस्थीत असलेल्यापैकी कमीतकमी 30 भारतीय हे शाकाहारी आहेत.

ब) कमीत कमी 10 भारतीय हे मांसाहारी आहेत.

1) फक्त अ

2) फक्त ब

3) अ आणि ब दोन्ही

4) अ आणि ब दोन्ही नाही

***

DeccanIAS